# मुंबईतील मेट्रो स्थानके पूरमुक्त

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुंबईतील पहिली भूमिगत मेट्रो कुलाबा ते सिप्झपर्यंत धावणार असून या मेट्रोची सर्व स्थानके पूरमुक्त असणार आहेत.

भूमिगत मेट्रोची स्थानके जमिनीच्या १.५ मीटर खाली बांधण्यात आली आहेत आणि पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी विशेष व्यवस्थासुद्धा करण्यात आली आहे. पावसाळ्यात बऱ्याचवेळा मुंबईत पूरस्थिती उद्भवते, एन्ट्री आणि एक्झिट पॉईंटकडून पावसाचे पाणी शिरण्याची शक्यता आहे. त्यानुसार अडवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. अतिवृष्टीसारखी परिस्थिती उद्भवली तर फ्लडगेट्स हे पाणी अडवण्यासाठी सक्षम आहेत, असा दावा मेट्रो ३ कडून करण्यात आला आहे. शिवाय मेट्रो ३ च्या भूमिगत स्थानकात पावसाचे पाणी साचले तर त्याचा उपसा करण्यासाठी एमएमआरसीने पंपसुद्धा लावले आहेत.